0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

**वाचा :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि.०२/०२/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०११/जा.११२, दि.१०/०२/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दि.२८/०२/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया, गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया व राजेंद्र छागुर मिश्रा, मॅनेजर यांचे दिनांक २८/०२/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दि.०६/०७/२०११ रोजीचे पत्र.

६) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०११/जा.६१०, दि.२९/०७/२०११,

७) गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया, गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया व राजेंद्र छागुर मिश्रा, मॅनेजर यांचे दिनांक ०९/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

८) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दिनांक ०८/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले अभिवेदन.

---

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०११/जा.७००
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक : २९ /०८/२०११.

## <u>आदेश</u>

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### <u>प्रकरणाची पार्श्वभूमी :-</u>

समिता इंडस्ट्रियल कॉम्पलेक्स, बिल्डिंग नं. १५, साकीनाका, मुंबई- ७२ या ठिकाणी लुब्रिकेटिंग ऑईलचा अवैद्य साठा करुन ठेवला असून गैरव्यवहार होत आहे, अशी खात्रीलायक खबर दिनांक ३१/०१/२०११ रोजी

साकीनाका पोलीस स्टेशनला मिळाल्यावरुन तेथील अधिकारी दोन पंचासह उक्त ठिकाणी गेले. सदर ठिकाणी पश्चिमेकडील गेटमधून गाळा नंबर २ समोर आले असता, सदर गाळ्याचे समोर उत्तर भितीलगत गाळा नं. २ ते ५ समोर उघडया जागेवर एकावर एक ठेवलेले २०० लिटर क्षमतेचे द्रवपदार्थाने भरलेले एकूण १०७ लोखंडी बॅरल दिसून आले. तसेच गाळा नं. २ ते ३ चे समोर उघडया जागेत गाळयालगत २०० लिटर क्षमतेचे द्रवदार्थाने भरलेले एकूण १२ लोखंडी बॅरल दिसून आले असे एकूण ११९ लोखंडी बॅरल २०० लिटर क्षमतेचे दिसून आले.

सदर गाळा क्र. २ हा उघडा असून सदर गाळयामध्ये प्रवेश केला असता, सदर गाळयात एक इसम हजर असलेला दिसला. त्यास अधिकाऱ्यांनी नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विपूल मासुक तुराखिया असे सांगितले. त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने तो सदर गाळयाचा मालक असून सदर गाळयात मे. ब्राईट पेट्रोकेम या नावाने लुब्रिकेटिंग ऑईल व ग्रिस या मालाचा व्यापार करीत असल्याचे सांगितले व सदर व्यवसायाबाबत त्याचेकडे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज, मुंबई तसेच बृहमुंबई महानगरपालिका यांचेकडील १०,००० लिटर्स लुब्रिकेटिंग ऑईल साठा करण्याचा परवाना असल्याचे सांगितले. तसेच गाळयासमोरील उघडया जागेत द्रवपदार्थाने भरलेले लोखंडी बॅरलबाबत विचारणा केली असता, सदरचा माल हा त्याचे मालकीचा असून त्यामध्ये लुब्रिकेटिंग ऑईल असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर गाळयातील मालाची पाहणी केली असता, सदर गाळयामध्ये परवान्याव्यतिरिक्त प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी बॅरल लुब्रिकेटिंग ऑईलने भरलेले आढळून आले. सदर गाळयातील व गाळयासमोरील उघडया जागेवरील मालाबाबत त्याचेकडे कागदपत्र व बिलांबाबत विचारणा केली असता, त्याने कोणतीही उपयुक्त माहिती सादर केली नाही. सदरचा साठा त्याने अवैधरित्या विनापरवाना साठा करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाल्याने त्याच्या संमतीने खात्री केली असता गोडावूनमध्ये व गोडावूनच्या समोर बाहेरील मोकळया जागेत, प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ११९ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ एकूण २३८०० लि. तसेच प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ एकूण १६२०० लि. साठा आढळून आला.

त्यानंतर मिळालेल्या बातमीप्रमाणे पोलिस पथकाने पंचासह वर नमूद गाळयालगत सदर संगिता कॉम्पलेक्स बिल्डिंग नं. १५, गाळा नं. ४, साकीनाका, मुंबई - ७२ येथील गोडावूनमध्ये सुध्दा लुब्रिकेटिंग ऑईलचा अवैधरित्या साठा करुन ठेवल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी गेले असता, सदर गाळा उघडया स्थितीत आढळून आला व सदर गाळयात एक इसम हजर असल्याचे दिसून आले. त्यास पोलिस पथकाने त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव राजेंद्र छागुर मिश्रा असे सांगून त्याने सदर गाळयात मे. ब्लॉसम पेट्रोकेम या नावाने लुब्रिकेटिंग ऑईल व ग्रिस या मालाचा श्री पुनित मासुक तुराखिया यांचे मालकीचा ट्रेडिंगचा व्यवसाय असून त्याचेकडे ते मॅनेजर म्हणून नोकरी करीत असल्याचे सांगितले व सदर व्यवसायाबांबत त्याचेकडे डायरेक्टर ऑफ

CONTROLLER OF RATIONING HEAD

इंडस्ट्रीज, मुंबई तसेच बृहनमुंबई महानगरपालिका यांचेकडील १०,००० लिटर्स लुब्रिकेटिंग ऑईल साठा करण्याचा परवाना असल्याचे सांगितले. सदर गाळयातील मालाची पाहणी करता सदर गाळयामध्ये परवान्याव्यतिरिक्त अतिरिक्त, प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ६३ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ एकूण १२,६०० लिटर साठा मिळून आला. सदर गाळयातील मालाबाबत त्याचेकडे कागदपत्र व बिलाबाबत विचारणा केली असता, त्याने कोणतीही उपयुक्त माहिती सादर केली नाही.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सदर गोडावूनमध्ये अवैधरित्या विनापरवाना लुब्रिकेटिंग ऑइलचा साठा करुन ठेवल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ सह (२) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२), ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था.गु.नों.क्र. ०६/२०११, दि.०१/०२/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले:

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | गाळा क्र. २ समोरील मोकळया जागेमधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ११९ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ | २३८०० लिटर | ८,३३,०००/- |
| २ | गाळा क्र. २ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ | १६२०० लिटर | ५,६७,०००/- |
| ३ | गाळा क्र. ४ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ६३ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात लुब्रिकेटिंग ऑईलसारखा द्रवपदार्थ | १२,६०० लिटर | ४,४१,०००/- |
| | | एकूण | १८,४१,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २८/०२/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०२/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक श्री संभाजी मोहीते हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र.३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले.

तसेच दिनांक २८/०२/२०११ रोजीच्या सुनावणीस ॲड. किर्ती पारेख हे गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया, गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया व राजेंद्र छागुर मिश्रा, मॅनेजर यांचेवतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहीले व त्यांचे वाचावे क्र.४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तद्नंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी त्यांचे वाचावे क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर केला. सदर रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून वाचावे क्र. ६ अन्वये नोटीस बजावून पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया, गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया व राजेंद्र छागुर मिश्रा, मॅनेजर हे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र.७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, दरम्यान त्यांनी त्यांचे अभिवेदन वाचावे क्र. ८ अन्वये टपालामार्फत सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

## युक्तिवाद :-

सुनावणीचे वेळी तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, आरोपी यांचे गोडावून व मोकळ्या जागेत परवान्या व्यतिरीक्त अतिरीक्त साठा आढळून आला असून, सदर लुब्रिकेटींग ऑईलचा साठा अवैद्यरित्या बाळगला म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर जप्त केलेला मुद्देमाल अवजड व वाहतुकीस धोकादायक असल्याने जागेअभावी व सुरक्षेततेसाठी घटनेच्या ठिकाणी सीलबंद करुन ठेवण्यात आला आहे. सदर मुद्देमाल आरोपीतांना परत करणेस पोलीसांची हरकत आहे, असे नमुद केले आहे.

गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया तसेच मॅनेजर राजेंद्र छागुर मिश्रा, यांनी ॲड. किर्ती पारेख यांचे वकालतनाम्यासह सादर केलेल्या संयुक्त निवेदनात, गाळा नं.४ तसेच मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया हे स्वत: आहेत. त्यांचेकडे लुब्रीकेंटिंग ऑईलच्या व्यवसायाकरीता उद्योग संचालक यांचेकडील तसेच साठवणूकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगर पालीका यांचा परवाना आहे. जीवनावश्यक वस्तु कायद्यांतर्गत उद्योग संचालक यांचेकडील परवान्यावर ऑईलची किती साठवणूक करावी, हे नमुद केले नाही. तसेच लुब्रीकेटींग ऑईल संदर्भात १९८७ चे आदेशातही याबाबत नमुद केलेले नाही. त्यामुळे लुब्रीकेटींग ऑईलची कितीही साठवणूक केली तरी तो उक्त आदेशानुसार अपराध होत नाही. तसेच बृहन्मुंबई महानगर पालीका यांच्या साठवणुक परवान्यावर १०००० लिटर मर्यादा नमुद केली आहे. सदर मर्यादेपेक्षा जास्त साठवणूक केल्यास बृहन्मुंबई महानगर पालीका यांना त्यांचे कायद्यातील कलम ३९४ आर/डब्ल्यू, ४७१ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याच्या अधिकार आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन झाले असेल तरच सदर कायद्यातील कलम ६-अ नुसार जप्त मुद्देमालाबाबत हे कार्यालय आदेश देवू शकतात. त्याने सदर गोडावूनमध्ये अधिकृतपणे लुब्रीकेटींग ऑईलची साठवणूक केली आहे व त्याबाबतची खरेदी बिले त्याचेकडे आहेत. त्याने जीवनावश्यक वस्तु कायद्याचे उल्लंघन केले नसल्याने जप्त केलेला संपुर्ण साठा परत मिळावा, असे नमुद केले आहे.

तसेच गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया यांनी ॲड. किर्ती पारेख यांचे वकालतनाम्यासह वरिलप्रमाणेच त्यांचे निवेदन सादर केले आहे.

तद्‌नंतर रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांनी दिनांक ०९/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल ल्युब्रिकेटींग ऑईल अटी व शर्तीच्या अधीन राहून परत करणेबाबत आदेश होणेस पोलीसांची काहीही हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक पुनित मासुक तुराखिया, गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक विपूल मासुक तुराखिया तसेच मॅनेजर, राजेंद्र छागुर मिश्रा यांनी युक्तिवाद केला की, त्यांचेकडे लुब्रीकेंटिंग ऑईलच्या व्यवसायाकरीता उद्योग संचालक यांचेकडील परवाना आहे. जीवनावश्यक वस्तु कायद्यांतर्गत उद्योग संचालक यांचेकडील परवान्यावर ऑईलची किती साठवणूक करावी, हे नमुद केले नाही. तसेच लुब्रीकेटींग ऑईल संदर्भात १९८७ चे आदेशातही याबाबत नमुद केलेले नाही. त्यांनी सदर गोडावूनमध्ये अधिकृतपणे लुब्रीकेटींग ऑईलची साठवणूक केली आहे व त्याबाबतची खरेदी बिले त्यांचेकडे आहेत. तसेच जप्त केलेल्या मुद्देमालाचा रासायनिक पृथ:करण अहवाल लुब्रीकेटींग ऑईल असा आला

असूनि जीवनावश्यक वस्तु कायद्याचे त्यांनी उल्लंघन केले नसल्याने जप्त केलेला संपुर्ण साठा त्यांना परत करावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनाक ३१/०१/२०११ रोजी साकीनाका पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील अधिकाऱ्यांनी समिता कॉम्पलेक्स, बिल्डिंग नं. १५, गाळा नं. २, साकीनाका, मुंबई- ७२ चे समोर पंचासह गेले असता, सदर ठिकाणी उघड्या जागेवर तसेच गाळा नं. २ मध्ये ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा आढळून आला. सदर साठ्याबाबत तेथे उपस्थित विपूल मासुक तुराखिया या इसमाकडे विचारणा केली असता, सदरचा माल हा त्याचे मालकीचा व त्यामध्ये लुब्रिकेटिंग ऑईल असून त्याचेकडे लुब्रिकेटिंग आईलच्या व्यवसायाकरिता परवाना असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर गाळयातील मालाची पाहणी केली असता, सदर गाळयामध्ये परवान्याव्यतिरिक्त प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी बॅरल लुब्रिकेटिंग ऑईलने भरलेले आढळून आले. सदर गाळयातील व गाळयासमोरील उघडया जागेवरील मालाबाबत त्याचेकडे कागदपत्र व बिलाबाबत विचारणा केली असता, त्याने कोणतीही उपयुक्त माहिती सादर केली नाही. त्यानुसार सदरचा साठा त्याने अवैधरित्या विनापरवाना साठा करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाली. तद्नंतर त्या ठिकाणीं असलेल्या गाळा नं. ४ ची तपासणी केली असता, त्या गाळ्यामध्ये सुध्दा ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा आढळून आला. सदर साठ्याबाबत तेथे उपस्थित राजेंद्र छागुर मिश्रा या इसमाकडे विचारणा केली असता, सदर गाळयात मे. ब्लॉसम पेट्रोकेम या नावाने लुब्रिकेटिंग ऑईल व ग्रिस या मालाचा पुनित मासुक तुराखिया यांचे मालकीचा ट्रेडिंगचा व्यवसाय असून त्याचेकडे ते मॅनेजर आहेत. सदर व्यवसायाबांबत त्याचेकडे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई तसेच बृहनमुंबई महानगरपालिका यांचेकडील १०,००० लिटर्स लुब्रिकेटिंग ऑईल साठा करण्याचा परवाना असल्याचे सांगितले. सदर गाळयातील मालाची पाहणी करता, सदर गाळयामध्ये परवान्याव्यतिरिक्त अतिरिक्त, प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ६३ लोखंडी पत्र्याचे बॅरल लुब्रिकेटिंग ऑईलने भरलेले आढळून आले. सदर गाळयातील मालाबाबत त्याचेकडे कागदपत्र व बिलाबाबत विचारणा केली असता, त्याने कोणतीही उपयुक्त माहिती सादर केली नाही. यावरुन गाळा नं. २ समोरील मोकळ्या जागेतील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ११९ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे २३८०० लिटर लूब्रीकेटींग ऑईल तसेच गाळा नं. २ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १६२०० लिटर

लूब्रीकेटींग ऑईल त्याचप्रमाणे गाळा नं. ४ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ६३ लोखंडी पत्र्यांचे बॅरल असे एकूण १२६०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी पोलीसांनी धाड टाकून धाडीच्या ठिकाणी उपस्थित इसमाकडे विचारणा केल्यानुसार, त्यांचेकडे असलेल्या परवान्यावर नमुद मर्यादे व्यतिरीक्त अतिरीक्त साठा आढळल्याने सदर द्रवपदार्थाचा साठा पोलीसांनी जप्त केला. सुनावणी दरम्यान दोन्ही गाळयांमधील जप्त साठ्याचे मालक यांनी सदर साठा खरेदी केल्याची बिले तसेच दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय,ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ नुसार सदर साठ्याच्या व्यवसायाकरीता आवश्यक असलेला सह संचालक उद्योग (एमएमआर) यांचेकडील अनुक्रमे परवाना क्र.बीएमआर/ल्युब ऑईल ग्रिसेस ऑर्डर/००४७/२००९/३९४४ दि. १४/०९/२००९ अन्वये दि. १३/०९/२०१४ पर्यंत वैध तसेच परवाना क्र.बीएमआर/ल्युब ऑईल ग्रिसेस ऑर्डर/४६/२००९/३९४५ दि. १४/०९/२००९ अन्वये दि. १३/०९/२०१४ पर्यंत वैध त्याचप्रमाणे गाळा नं. २ व ४ मध्ये ल्युब ऑईलच्या साठवणुकी करीता बृहन्मुंबई महानगर पालीका यांचेकडील अनुक्रमे क्र.७६१०२९००६ तसेच क्र.७६१०५९१४१ परवाना सादर केला आहे.

तसेच दोन्ही गाळ्याचे मालक पुनित मासुक तुराखिया व विपुल मासुक तुराखिया यांनी सादर केलेल्या खुलाशात, जीवनावश्यक वस्तु कायद्यांतर्गत लुब्रीकेटींग ऑईलच्या व्यवसायाकरीता घेण्यात आलेल्या उद्योग संचालक यांचेकडील परवान्यावर ऑईलची किती साठवणूक करावी, हे नमुद केले नाही. तसेच लुब्रीकेटींग ऑईल संदर्भात १९८७ चे आदेशातही याबाबत नमुद केलेले नाही. त्यामुळे लुब्रीकेटींग ऑईलची कितीही साठवणूक केली तरी तो उक्त आदेशानुसार अपराध होत नाही. तसेच बृहन्मुंबई महानगर पालीका यांच्या साठवणुक परवान्यावर जी मर्यादा नमुद केली आहे, त्या मर्यादेपेक्षा जास्त साठवणूक केल्यास बृहन्मुंबई महानगर पालीका यांना त्यांचे कायद्यातील कलम ३९४ आर/डब्ल्यू, ४७१ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याच्या अधिकार आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन झाले असेल तरच सदर कायद्यातील कलम ६-अ नुसार जप्त मुद्देमालांबाबत हे कार्यालय आदेश देवू शकतात. त्यांनी सदर गोडावूनमध्ये अधिकृतपणे लुब्रीकेटींग ऑईलची साठवणूक केली आहे व त्याबाबतची खरेदी बिले त्याचेकडे आहेत. त्याने जीवनावश्यक वस्तु कायद्याचे उल्लंघन केले नसल्याने जप्त केलेला संपुर्ण साठा परत मिळावा, असे नमुद केले आहे.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथःकरणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथःकरण अहवाल Exhibit Nos. 1 to 9 contain lubricating oil असा प्राप्त झालेला आहे. पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने दोन्ही गाळ्यातील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाचा रासायनिक

पृथ:करण अहवाल लुब्रीकेटींग ऑॅईल असा आला असून, त्यांनी जीवनावश्यक वस्तु कायद्याचे उल्लंघन केले नसल्याने तसेच त्यांचेकडे व्यवसायाकरीता उद्योग संचालक यांचेकडील परवाना असल्याने जप्त केलेला संपुर्ण साठा त्यांना परत करावा, असे नमुद केले आहे. तसेच सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल ल्युब्रिकेटींग ऑईल अटी व शर्तीच्या अधीन राहून परत करणेबाबत आदेश होणेस पोलीसांची काहीही हरकत नसल्याचा अहवाल पोलीसांनी दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांनी दिलेला रासायनिक पृथ:करण अहवाल पहाता, सदर गुन्ह्यात जप्त केलेला द्रवपदार्थ ल्युब्रीकेटिंग ऑईल असल्याचे दिसून येत असून, त्या द्रवपदार्थात कोणतीही भेसळ नसल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच साठ्याचे मालक यांनी, ल्युब्रीकेटींग ऑईलचा व्यवसायाकरीता आवश्यक असलेले परवाने संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केले असल्याचे दिसून येते.

तथापी, दोन्ही गाळ्याचे मालक यांनी लुब्रीकेटींग ऑईलच्या साठवणुकीकरीता सादर केलेल्या बृहन्मुंबई महानगर पालीका यांचेकडील परवान्यावर नमुद साठवणुंकीची मर्यादा पहाता, दोन्ही गाळ्याचे मालक यांनी सदर परवान्यावर नमुद मर्यादेपेक्षा जास्त लुब्रीकेटींग ऑईलची साठवणूक केली असल्याचे सिध्द होत असल्याने सदर गुन्ह्यातील गाळा क्र.२ व ४ च्या दोन्ही परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सह संचालक (एमएमआर) तसेच बृहन्मुंबई महानगर पालीका या परवाना प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

सबब, उपरोक्त बाब विचारात घेता, गाळा नं २ समोरील मोकळ्या जागेतील एकूण २३८०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा, गाळा नं. २ मधील एकूण १६२०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा तसेच गाळा नं. ४ मधील एकूण १२६०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा हा त्यांच्या मुल्याएवढया किंमतीच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर त्यांच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०६/२०११, दि.०१/०२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

0009

**आदेश :**

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गाळा नं २ समोरील मोकळ्या जागेतील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ११९ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे २३८०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा, गाळा नं. २ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ८१ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १६२०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा तसेच गाळा नं. ४ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ६३ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १२६०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा हा त्यांच्या मुल्याएवढया किंमतीचे क्षतीपुर्ती बंधपत्र पोलिसांनी घेऊन त्यांच्या मालकांस परत करण्यात यावा.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) विपूल मासुक तुराखिया, गाळा क्र. २ व मे. ब्राईट पेट्रोकेम चे मालक
२) राजेंद्र छागुर मिश्रा, मॅनेजर
३) पुनित मासुक तुराखिया, गाळा क्र. ४ व मे. ब्लॉसम पेट्रोकेमचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0010